Postal Reg. No. RTR/013/2021-2023

कोकणचे सर्वाधिक खपाचे दैनिक

# रत्नागिरी टाइम्स

रत्नागिरी

सोमवार, दि. १९ डिसेंबर २०२२

# मराठा मंदिर ग्लोबल स्कूलतर्फे विद्यार्थ्यांसाठी रोबोटिक्स, कोडींग कार्यशाळेचे आयोजन





मराठा मंदिरच्यावतीने ग्लोबल स्कूल येथे आयोजित करण्यात आलेल्या रोबोटिक्स आणि कोडींग कार्यशाळेचे फीत कापून उद्घाटन करताना माजी नगर रचनाकार सुरेशराव सुर्वे, याप्रसंगी विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, सौ. ममता नलावडे, नेताजी कुंभार, प्रशांत जाधव इत्यादी तर दुसऱ्या छायाचित्रात या उपक्रमात अतिशय उत्साहाने सहभागी झालेली मराठा मंदिर ग्लोबल स्कूलची मुले.

रत्नागिरी, १८ डिसें. : कोकणातील विशेषत: रत्नागिरीतील विद्यार्थ्यांना बोटिक्स आणि कोडींगसारख्या व्याने विकसित होऊ घातलेल्या गणकीय प्रणालीचे ज्ञान व्हावे आणि क्षेत्रात करिअरच्या वाटा शोधता व्यात या उदात्त हेतूने मराठा मंदिर स्थेने तीन दिवसीय रोबोटिक्स व र्डींग कार्यशाळेचे आयोजन केले ते. या कार्यशाळेत तरत्नागिरी शहर णि परिसरातील तसेच तालुक्यातील विध शाळातील अनेक विद्यार्थ्यांनी हभाग घेऊन नव्या वाटा शोधण्याचा ढा गिरवला.

या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन ण्यासाठी ठाणे येथील रोबोटिक्स णि कोडींगचे तज्ज्ञ अंजुम मुजावर तीन वस उपस्थित होते. अंजुम मुजावर हे लार्सन अँड टुब्रोचे कार्पोरेट ट्रेनर असून मोटार वर्ल्ड स्किल कॉम्पिटिशन ट्रेनर म्हणून येथे काम करतात. एवढेच नव्हे तर टाटा पॉवरचे कौन्सिल सदस्य आणि आय आय टी सारख्या नामांकित संस्थेच्या अभ्यासक्रम समितीवर सदस्य असलेल्या मुजावर यांनी विद्यार्थ्यांना रोबोट बनवण्याच्या तंत्रज्ञानाची ओळख करून दिली. या तीन दिवसाच्या कार्यशाळेत विद्यार्थ्यांनी कोडींग बरोबरच रोबोटही बनवले आणि ते चालूनहीं दाखवले. त्यामुळे विद्यार्थ्यांमध्ये या नव्या क्षेत्राबद्दल कमालीची उत्सुकता वाढीस लागली.

रोबोटिक्स आणि कोडींग कार्यशाळेच्या उद्घाटनप्रसंगी माजी नगर रचनाकार आणि क्षत्रिय मराठा मंडळाचे पदाधिकारी सुरेशराव सुर्वे, मराठा मंदिर विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार, विश्वस्त शंकरराव पालदेसाई, ग्लोबल स्कूलच्या प्राचार्या कविता विश्वकर्मा, शालेय समिती सदस्य संतोष नलावडे, सौ. ममता नलावडे, स.रा. देसाई अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य नेताजी कुंभार, प्रमोद शेखर, प्रा. शंकर जाधव, मंजुश्री राणे, प्रा.रावराणे यांच्यासह विविध शाळातील शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

तीनही दिवस विद्यार्थ्यांनी या कार्यशाळेचा लाभ घेतला. विद्यार्थ्यांनी आपले अनुभव कथन करताना अंजूम मुजावर सर यांच्याबद्दल भरभरून बोलले. तसेच मराठा मंदिरने पदरमोड करून विद्यार्थ्यांना नव्या तंत्रज्ञानाची ओळख व्हावी यासाठी ही कार्यशाळा घेतली, त्याबद्दलही विद्यार्थी आणि पालकांनी धन्यवाद दिले.

गेल्या दोन-तीन वर्षापासून 'मराठा मंदिर' ने रोबोटिक्स आणि कोडिंग याचा कोकणातील विद्यार्थ्यांना परिचय व्हावा यासाठी प्रयत्न चालविला आहे. या तीन दिवसाच्या कार्यशाळेने विद्यार्थ्यांमधील आत्मविश्वास अधिकच वाढल्याचे दिसून आले. तीन दिवसाच्या कार्यशाळेचे यशस्वी आणि नेटके आयोजन करण्यासाठी मराठा मंदिर ग्लोबल स्कूलच्या प्राचार्या आणि त्यांच्या सहकारी यानी चांगली मेहनत घेतली होती. रत्नागिरी सारख्या शहरात ही कार्यशाळा आयोजित करून ती यशस्वी केल्याबद्दल पालक वर्ग आणि विद्यार्थ्यांमधून समाधान व्यक्त होत आहे.

### विद्यार्थ्यांचा विकास हेच ध्येय: योगेश पवार

मराठा मंदिर ग्लोबल स्कूलमध्ये रत्नागिरी शहरातील सर्वच स्तरातील विद्यार्थी शिक्षण घेत आहेत या विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करण्याचे ध्येय डोळ्यासमोर ठेवून मराठा मंदिर विविध प्रकारचे उपक्रम राबवीत आहे प्रशालेमध्ये सुसज्ज असा जलतरण तलाव आहे. याचबरोबर विद्यार्थ्यांना लहानपणापासूनच क्रिकेटचे धडे मिळावेत यासाठी मशीनच्या सहाय्याने गोलंदाजी करणारे नेट प्रॅक्टिस स्पीच तयार करण्यात आले आहे. याव्यतिरिक्त इतरही महत्त्वकांक्षी उपक्रम राबवण्यात येणार असल्याची माहिती विद्यावर्धिनीचे अध्यक्ष योगेश पवार यांनी दिली.